## 1. मोड्युलचे सविस्तर वर्णन आणि त्याची रचना

| मोड्यूल सविस्तर | |
|---|---|
| विषयाचे नाव | अर्थशास्त्र |
| अभ्यासक्रमाचे नाव | भारताची आर्थिक प्रगती ०१ (इ.११वी, सत्र पहिले) |
| मोड्युलचे नाव / शीर्षक | स्वातंत्र्योत्तर काळातील भारताची अर्थव्यवस्था भाग १ |
| मोड्यूल आय.डी. | keec_10101 |
| पुर्वापेक्षित | काही अटी व् संकल्पनांचे ज्ञान जसे<br>वसाहतींचे नियम, राष्ट्रीय उत्पन्न,<br>आर्थिक क्षेत्रे |
| उद्दिष्टे | हा धडा वाचल्यानंतर, विद्यार्थ्यांना खालील गोष्टी शिकण्याची व् समजू न घेण्याची पात्रता लाभेल :<br>• स्वातंत्र्याच्या वेळेची भारतीय अर्थव्यवस्थेची विविध वैशिष्ठे ,<br>• अविकसित भारतीय अर्थव्यवस्थेला कारणीभूत असणाऱ्या घटकांचे स्पष्टीकरण |
| संकेतिक शब्द | शेतीचे बाजारीकरण, कापूस आणि जूट कापड गिरण्या, लोकसंख्या शास्त्रीय संक्रमण, हस्तकला, अर्भकाच्या मृत्यूचा दर, जीवनमानाचा अपेक्षित दर, जागेचा तोडगा, आगगाड्या, तारायंत्र, जमीनदारी पद्धती. |

## 2. Development Team

| Role | Name | Affiliation |
|---|---|---|
| National MOOC Coordinator (NMC) | Prof. Amarendra P. Behera | CIET, NCERT, New Delhi |
| Program Coordinator | Dr. Mohd. Mamur Ali | CIET, NCERT, New Delhi |
| Course Coordinator (CC) / PI | Prof. Neeraja Rashmi | DESS, NCERT, New Delhi |
| Subject Matter Expert (SME) | Dr. Janmejoy Khuntia | School of Open Learning, |
| Review Team | Dr. Meera Malhan | DCAC, University of Delhi |
| Translator | Dr. Parag Ramakant Kukade | Assistant Prof., Takshashila Mahavidyalaya Amravati |

**अनुक्रमाणिका:**

1. प्रस्तावना
2. लोक्संख्याशास्त्रीय स्थिती
3. व्यावसायिक रचना
4. पायाभूत सुविधा
5. शेतीची स्थिती
6. उद्योगांची स्थिती
7. विदेश व्यापाराची स्थिती
8. सारांश

**प्रस्तावना**

भारताला स्वातंत्र्य मिळून १९४७ ते २०१७ या कालावधीतील सात दशके होऊन सुद्धा, भारत देशाची गणना जगातील गरीब स्थितीतील देशांमध्ये करण्यात येते. भारताच्या वास्तविक सद्यस्थितीतील आर्थिक स्थितीला जवाबदार असणारा एक प्रमूख घटक म्हणजे देशाची इतिहास काळांतील प्रगती होय. जेव्हा १९४७ साली, अंदाजे २०० वर्षे राज्य करून इंग्रजांनी भारत देश सोडला, भारत सरकारने त्यांच्याच कडून त्यांच्या दृष्टीपथातीलअर्थव्यवस्थेचा वारसा घेतला. म्हणूनच, इंग्रजी सरकारच्या अधिपत्याखाली झालेल्या भारतीय आर्थिक विकासाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. आपले वर्गीकरण स्वातंत्र्य पूर्व काळांतील लोक्संख्याशात्रीय स्थितीवर,व्यावसायिक रचनेवर, पायाभूत सुविधांवर, शेतीच्या स्थितीवर, उद्योगांच्या स्थितीवर आणि विदेश व्यापाराच्या स्थितीवर प्रकाश टाकते.

**लोक्संख्याशास्त्रीय स्थिती:**

भारतीय अर्थव्यवस्थेची लोक्संख्याशास्त्रीय स्थितीचा विविध मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करता येतो जसे लोकसंख्येची वाढ, शिक्षणाची पातळी, मृत्यूचा दर इ. भारतामध्ये पहिली जनगणना १८७२ मध्ये न-समकालिक पद्धतीने घेतली गेली. पण तरीही इंग्रजांच्या काळातील भारतीय लोकसंख्येची बरीचशी माहिती १८८१ च्या जनगननेद्वारे प्रथमतः घेण्यात आली. विशिष्ठ मर्यादा वगळता, असे दिसून आले की भारताच्या लोकसंख्या वाढीमध्ये विषमता आहे. अनुक्रमे, दर दहा वर्षांमध्ये लोकसंख्या मोजणीची सक्रीय मोहीम घेतली गेली.

लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण सिद्धान्तानुसार ३ पायऱ्या येतात:
पायरी १ ली – जेथे जन्माचा दर आणि मृत्यूचा दर उच्च असतो,
पायरी २ री – जेथे जन्माचा दर उच्च असतो आणि मृत्यूचा दर नीच असतो,
पायरी ३ री – जेथे जन्म आणि मृत्यू दोन्ही दर नीच पातळीचे असतात.

याची लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाच्या सिद्धांताशी तुलना करता ते १८८१ ते १९२१ या कालावधीत सहज तपासता येते, या काळांत भारत लोक्संख्याशास्त्रीय संक्रमणाच्या प्रार्थमिक पायरीवर होता. या कालावधी मध्ये लोकसंख्येची वाढ हि अगदी शुल्लक होती कारण जन्माचा आणि मृत्यूचा दर खूप अधिक होता आणि एकमेकांच्या जवळपासच होता.लोक्संख्याशास्त्रीय संक्रमणाची दुसरी पायरी १९२१ नंतर लक्षात आली, ज्या काळांत लोकसंख्या वाढ मोठ्या प्रमाणात झाली. दुसरी पायरी हि जन्माचा अधिक दर आणि मृत्यूचा कमी दर याद्वारे अंकित झाली अशाप्रकारे झपाटयाने वाढणाऱ्या लोकसंख्येला कारणीभूत ठरली.

सन १९२१ ते स्वतंत्र भारताची १९५१ मधील पहिली जनगणना यांमध्ये लोकसंख्या २५ करोड पासून ३६ करोड पर्यंत वाढली. म्हणूनच, स्वातंत्र्याच्या वेळी भारत अधिक लोकसंख्या वाढीच्या धोक्यामुळे दबावाखाली होता.

समाज विकासाचे दर्शक असे विविध घटक जसे शिक्षणाचा दर आणि मृत्यूचा दर यांना सुद्धा उत्तेजन मिळत नव्हते. संपूर्ण शिक्षणाची पातळी हि १६ टक्क्यांपेक्षा कमी होती. यांमधून स्त्रियांच्या शिक्षणाची पातळी ७ टक्क्यांपर्यंत म्हणजे अगदी शुल्लक होती. संपूर्ण मृत्यूचा दर खूप अधिक होता आणि त्यात प्रामुख्याने अर्भकांच्या मृत्यूचा दर एक हजारी ४१ एवढा २०१६ मध्ये अद्ययावत होता. अपेक्षित जीवनमान खूप कमी होते – ते २०१६ मध्ये ३२ वर्षे इतके जवळपास ६९ वर्षांच्या तुलनेमध्ये होते. यांवरून असे दिसून येते की सार्वजनिक आरोग्य सुविधा या पूर्णपणे अपुऱ्या होत्या. यातूनच पाणी आणि वायू प्रदूषणामुळे उद्भवणारे रोग सरोसपणे वाढत होते आणि त्यांनी मानवी जीवनावर एक मोठा टोल अजमाविला होता.

**व्यावसायिक रचना**

व्यावसायिक रचनेमध्ये अशा व्यक्तींचे विभाजन केले जाते की ज्या व्यक्ती विविध उद्योगांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये कार्यशील आहेत. यांमध्ये इंग्रजांच्या नियमांप्रमाणे थोडीशी बदलाची जाणीव दिसून आली. शेतीक्षेत्रामध्ये अधिकाधिक कार्यकारी लोकांचा सहभाग आहे, तो नेहमी अधिकतम पातळीवर म्हणजे ७०-७५ टक्क्यांपर्यंत राहतो, त्यावेळी उत्पादन आणि सेवाक्षेत्रांमध्ये फक्त १० आणि १५-२० टक्क्यांपर्यंत असतो. असे निरीक्षणास आले आहे की विविध विकसित अर्थव्यवस्थांमध्ये जिथे आर्थिक विकासाचा दर जास्त असतो तिथे अधिकाधिक टक्क्यांमध्ये कार्यकारी लोक शेतीक्षेत्रातून कालमानाप्रमाणे औद्योगिक आणि सेवाक्षेत्रांमध्ये संक्रमित झालेले असतात. व्यावसायिक रचनेचा हा कल भारतामध्ये ब्रिटीश राजवटीच्या दोन शतकांमध्ये हरवत  गेला त्यामधून असे दिसून आले की स्वातंत्र्याचे वेळी भारतामध्ये कृषी अर्थव्यवस्था अस्तित्वात होती. दोन महत्वाचे घटक यासाठी कारणीभूत होते. एक, इंग्रजांच्या आक्रमणाच्या अगोदर मुघल सत्तेमध्ये आणि प्रादेशिक राजे आणि राज्यकर्ते यांमध्ये  भारतातील हस्तकौशल्य उद्योग भरभराटीला आले. जेव्हाइंग्रजांनी आपल्या देशावर आक्रमण केले, ते मुघल शक्तीला – साम्राज्याला अधिक बलवान ठरले आणि त्यांनी प्रशासकीय राजांना किवा राज्यकर्त्यांना पराभूत केले आणि अशाप्रकारे येथील हस्तकौशल्य उद्योगांना त्यांनी उध्वस्त केले. परिणामी या उद्योग व्यवसायांत काम करणारे लोक हे बळेच ग्रामीण भागांमध्ये संक्रमित झाले आणि शेतीला त्यांनी त्यांचे जगण्याचे प्रमूख साधन म्हणून स्वीकार केला. दुसरे, भारतातील इंग्रज व्यवस्थापनाने लोकांना शेती व्यवसायामध्ये काम करण्यासाठी प्रवृत्त केले त्यासाठी ते शेतकऱ्यांना इंग्लंड मधील उद्योगिक कारखाने चालण्यासाठी लागणारा कच्चा माल पुरवठा करण्यासाठी रक्कम सुद्धा अदा करत असत. म्हणून, शेती व्यवसाय हा भारतातील प्रमूख व्यवसाय ठरला.

लोकांना कामाच्या विभाजानामध्ये सुद्धा काही विशिष्ट  प्रादेशिक विविधता होती. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि मद्रासच्या अध्यक्षपदाचे काही भाग ज्यामध्ये आजच्या दिवसांतले तामिळनाडू, आंध्रप्रदेश, केरळ आणि कर्नाटक या राज्यांतले काही भाग यांनी शेती क्षेत्रामध्ये असलेल्या लोकांच्या संख्येत घट अनुभवली आणि तेवढयाच प्रमाणात उत्पादन आणि सेवा क्षेत्रांत वाढ झाली. दुसरीकडे त्याच काळामध्ये इतर राज्यांत जसे ओरिसा, राजस्थान आणि पंजाब येथे शेतीक्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांमध्ये वाढ झाली.

## पायाभूत सुविधा

ब्रिटीश राजवटीतील एक सकारात्मक दृष्टीकोन असा होता की तेथे प्रार्थमिक पायाभूत सुविधा जसे आगगाडी, विमानतळे,जल वाहतुक, टपाल सेवा आणि तारायंत्र या दिल्या गेल्या होत्या. १८५० मध्ये झालेली आगगाडीची प्रास्ताविक ओळख हा त्याचा सर्वात महत्वाचा सहभाग होता. आगगाडीने राष्ट्रीय एकात्मिकतेमध्ये महत्वाची भूमिका निभावली कारण त्यामुळे भारतीय लोकांना दुरगामी प्रवास करणे सहज शक्य होत होते आणि त्याद्वारे भौगोलिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या येणारे अडथळे दूर होण्यास मदत होत होती.

तरीही हा विकास करण्यामागचा प्रमूख उद्देश हा विविध मार्गांनी समाजहिताची जोपासना करणे हा होता, ती खालीलप्रमाणे:

1) आगगाडी आणि रस्ते हे कच्च्या मालाची वाहतुक देशावरून जवळच्या विमानतळावर आणि तेथपासून पुढे इंग्लंडला वाहतुक करण्यासाठी गरजेचे होते. हा कच्चा माल इंग्लंडला पोहोचल्यानंतर त्यावर कारखान्यांमध्ये औद्योगिक प्रक्रिया केली जायची आणि त्याद्वारे उत्पादिते बनविली जात असत. हि उत्पादिते परत भारतामध्ये, इतर इंग्रज समाजांमध्ये आणि देशांमध्ये निर्यात केली जात असत. जेव्हा हा पक्का माल भारतीय विमानतळावर पोहोचत असे तेव्हा त्याची वाहतुक रस्ते आणि आगगाडी यंत्रणेद्वारे अधिक किमतीला विकण्यासाठी देशांतील विविध भागांत पाठविला जात असे. भारत म्हणजे इंग्रजी मालाची एक मोठी बाजारपेठच बनली होती, भारताला तेव्हा "खाद्य अर्थव्यवस्था " म्हटले जायचे.
2) तुम्हाला माहीतच आहे की इंग्रज लढाई करून इतर देशांमध्ये सुद्धा वसाहत करत होते. त्यासाठी ते युद्ध लढण्यासाठी लागणारी सेना बनविण्याच्या हेतूने लोकांची नेमणूक करत असत. म्हणूनच, रस्ते बांधणे आणि आगगाडी यंत्रणेचे जाळे पसरविणे हे सैनिकांच्या भारतामधील संचारासाठी त्यांना अत्यावश्यक वाटत होते.
3) रस्ते आणि आगगाडी यंत्रणेचे जाळे हे उत्पादितांच्या आणि इतर वस्तूंच्या विमानतळापर्यंत वाहतुकीसाठी उपयोगात आणले जायचे आणि तेथून ते पुढे इतर वसाहतींमध्ये आणि देशांमध्ये निर्यात केले जात असे. अशाप्रकारे, इंग्रजी प्रशासनाने खूप परकीय चलन कमविले.
4) इंग्रजी राजवटीमध्ये ज्या पायाभूत सुविधा बनविल्या गेल्या, त्या भारताला अपेक्षेप्रमाणे फारशा फायदेशीर ठरल्या नाहीत कारण या सुविधा अपुऱ्या आणि मर्यादित होत्या. वस्तुस्थितीवरून असे निदर्शनात आले की तेथे नेहमी विशेतः पावसाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामीण भागांत पोहोचण्यासाठी सर्व हवामानाना अनुकूल अशा रस्त्यांचा तीव्र तुटवडा राहायचा. भारताचा बहुतांश ग्रामीण भाग मुख्य प्रवाहांपासून वेगळा काढला जायचा. साहजिकच,म्हणून, या भागात राहणारे लोक इंग्रजी राजवटीत एका पाठोपाठ एक येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीपासून आणि दुष्काळापासून तीव्र पछाडले जात असत. आगगाडी सुरु झाल्यामुळे भारतीय लोकांना काही सामाजिक फायदे झाले, त्यांनी देशाच्या बऱ्याच आर्थिक नुकसानाला मागे टाकले.

रस्ते आणि आगगाडी शिवाय, वसाहतींतील वितरणासाठी अंतर्देशीय व्यापार आणि समुद्री मार्गांचा विकास करण्यासाठी उपाय सुद्धा स्वीकारले गेले. तरीही हे उपाय समाधानकारक नव्हते. अंतर्देशीय सागरी रस्ते काही वेळेला महाग सुद्धा ठरत असत. उदा. ओरिसाच्या किनारपट्टीवरील कालवा. जरी कालवा मोठया सरकारी तिजोरीतील खर्चाद्वारे किनारपट्टीवर बांधला गेला असला, त्याचा उपयोग अतिशय मर्यादित किवा असून नसल्यासारखाच होता. याचे मुख्य कारण होते की तो आगगाडीच्या स्पर्धेत

अपयशी ठरला, जो लवकरच कालव्याला समांतर अशा भागांत आडवा आला होता. म्हणूनच, हा प्रकल्प तत्वतः विसर्जित केला गेला.

पायाभूत सुविधेतील अजून एक महत्वाची प्रगती जी इंग्रजी राजवटीत भारतात विस्थापित झाली ती म्हणजे तारायत्राच्या प्रास्ताविकेतून प्रस्थापिलेली दूरसंचार यंत्रणा होय. १८५० मध्ये पहिली प्रायोगिक विद्युत तारयंत्रणा हि कलकत्ता आणि डायमंड हार्बर यामध्ये सुरु झाली. १८५१ मध्ये ती ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या कामांसाठी उपयोगांत आणली जाऊ लागली. १८५३ मध्ये भारताच्या काही भागांशी तारयंत्रणाद्वारे जोडली गेली ज्यामध्ये कलकत्ता,पेशावर,आग्रा, मुंबई ,चेन्नई यांचा समावेश होता. १८५४ मध्ये एक स्वतंत्र विभाग सुरु झाला जो तार सुविधा लोकांसाठी उपलब्ध करून देत होता. पहिली औपचारिक दूरसंचार सेवा देशामध्ये १८८१ मध्ये अस्तित्वात आली जेव्हा इंग्लंडच्या ओरिएन्तल टेलिफोन कंपनी लिमिटेडला सरकारने कलकत्ता, मुंबई,मद्रास आणि अहमदाबाद येथे टेलिफोन सुविधा प्रस्थापित करण्याचा परवाना दिला होता. जरी विद्युत तार सेवा हि महत्वाची प्रगती असली तरी बहुतांशवेळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी उपयोगांत आणली जात असे. वास्तविक तारयंत्र सेवा आणि टपाल सेवा या दोन्ही सेवा या लोकांच्या आवश्यक हेतूंसाठी कार्यरत असूनही सगळ्यांसाठी अपूर्याच राहिल्या.

**शेतीची स्थिती**

इंग्रज भारतात येण्यापूर्वी देशातील शेतीची स्थिती खूप समाधानकारक होती. बर्नियर या फ्रेंच प्रवाशाच्या म्हणण्याप्रमाणे तेथे अमर्याद अगणित कालवे येत असत की जे गंगा नेविगेशन आणि बंगालमधील पाटबंधारे यांपासून निर्माण झाले होते, ज्यांचा उपयोग गहू,भाज्या,धान्ये, पक्षी,बदक आणि गुस यांच्या पुरेश्या उत्पादनासाठी आणि स्वतःच्या वापरासाठी केला जातो. कापूस, सिल्क, भात, साखर, आणि लोणी यांची मोठया प्रमाणात निर्यात सुद्धा केली जाते. यांमध्ये प्रत्येक प्रकारचे विस्तृत प्रमाणांत डुकरांचे कळप, मेंढ्यांचे आणि बकर्यांचे कळप आणि मासे यांचा समावेश होता. बेर्नियरच्या म्हणण्याप्रमाणे बंगाल हे इजिप्त पेक्षा श्रीमंत राष्ट्र होते.

असे असले तरीसुदुद्धा कदाचित भारतीय शेती याविरुद्ध इंग्रज राजवटीमध्ये ठप्प झाली होती. याशिवाय, उत्पादनातील सुधारणा जी लागवडीची, शेती क्षेत्रातील उत्पादनाची जागा विस्तृत केल्यामुळे होते ती कमीच राहिली. यांसाठी खूप घटक कारणीभूत ठरले. एक शहरी भागांतील हस्तकला कौशल्य उद्योगांच्या समूळ नाशामुळे, ग्रामीण भागांत स्थायिक होण्यासाठी आणि शेती हा प्रमूख व्यवसाय म्हणून स्वीकारण्यासाठी पाठबळ दिले. दुसरे, इंग्लंडमधील उद्योगसमुहाना भारताकडून कच्च्या मालाची जसे कापूस,नील इ. आवश्यकता होती. यांसाठी इंग्रज प्रतिनिधी हा कच्चा माल भारतीय शेतकऱ्यांकडून रोख स्वरूपांत विकत घेऊन ठेवत असत. म्हणून, रोख रकमेच्या आकर्षणाने शेतकऱ्यांनी अन्न धान्य उत्पादनाच्या साधनांपासून वळून या पिकांची लागवड करण्यास सुरुवात केली. "रोख रकमेच्या बदल्यात पिक " हि प्रगती याला "भारतीय शेतीचे बाजारीकरण " असे म्हटले गेले.तिसरे, हे दोन्ही घटक भारतीय शेतीवर अधिक लोकसंख्या दबाव आणू लागले त्याबरोबर ८५ टक्के लोकसंख्या या क्षेत्रावर अवलंबून आहे. स्वातंत्र्याचे वेळी हा आकडा ७५ टक्के इतका होता जो आता पर्यंत अधिक वाढला आहे. अधिक लोकसंख्येचा दबाव हा मोठया प्रमाणात बेरोजगारी वाढण्यासाठी सुद्धा कारणीभूत ठरला. चौथे, सरकारी जमीन महसूल गोळा करण्यासाठी बंगालच्या अध्यक्ष पदीय जागेवरील तोडगा म्हणून सरकारी वसाहतीतून जमीनदारी पद्धती सुद्धा अस्तित्वात आली. देशाच्या इतर भागांमध्ये अशाप्रकारचे तोडगे

सुद्धा अस्तित्वात आले. जमिनदाराना विशिष्ठ रकमेचा जमीन महसूल गोळा करून तो सरकारकडे जमा करण्यासाठी पाचारण केले गेलेंनी तसे न केल्यास त्यांना त्यांची प्रतिष्ठा गमवावी लागत होती. म्हणून, जमीनदार त्यांचे सर्वस्वी प्रयत्न करीत होते, गरीब शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी काम करण्यापेक्षा सर्वंकष बलाने आपले महसूल संकलनाचे उद्दिष्ट गाठ्ण्याकडे अधिक लक्ष देत असत. पाचवे, तंत्रज्ञानाची कनिष्ठ पातळी, पाटबंधारे सुविधांचा अभाव आणि खतांचा शुल्लक वापर या सर्वांमुळे शेतकऱ्यांची दयनीय स्थिती झाली आणि शेतकी उत्पादन कमी प्रमाणात होण्यास सुरुवात झाली. सहावे, काही ठराविक प्रमाणात पाट बंधार्यानी युक्त आणि जमिनीचा संकलित भाग अविभाजित देशामधून पाकिस्तानकडे गेला.भारतातील जुट पिक उद्योग हा जवळपास जागतिक बाजारपेठेमध्ये एकाधिकार चालवीत होता त्यालासुद्धा ठेच पोहोचली आणि सम्पूर्ण जूट उत्पादनाचा भाग हा पूर्व पाकिस्तानचा एक हिस्सा बनला (आता बांगलादेश)

**उद्योगांची स्थिती**

१९ व्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध् शतकांत इंग्रज राजवटीमध्ये काही आधुनिक उद्योग आले होते. सुरवातीला त्यांची प्रगती कापूस आणि जूट कापड गिरण्या उभारणी पर्यंतच मर्यादित होती. कापूस कापड गिरण्या बहुतांशाने देशाच्या पश्चिम भागात स्थित होत्या जसे महाराष्ट्र आणि गुजरात तर जूट कापड गिरण्या प्रामुख्याने बंगालमध्ये केंद्रित झाल्या. जेव्हा कापूस गिरण्या प्रामुख्याने भारतीयांच्या मालकीच्या होत्या तर जूट कापड गिरण्या प्रामुख्याने परदेशियांच्या मालकीच्या होत्या. तरीही सर्वाधिक लाक्षणिक प्रगती २० व्या शतकाच्या प्रारंभी दिसून आली जेव्हा १९०७ मध्ये टाटा अयोर्न अन्ड स्टील कंपनीचे निगमन झाले. इतर थोडे काही उद्योगसमूह साखर, सिमेंट, कागद इ. अशा क्षेत्रांमध्ये सुद्धा दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर उदयास आले.

तरीही तेथे भांडवली वस्तू उद्योग जसे यंत्र साधनांचे उत्पादन करणारा उद्योग जो भारतातील पुढील औद्योगिकरणाला प्रोत्साहन देऊ शकेल असा एकही उद्योग अस्तित्वात नव्हता. म्हणूनच, शेतीप्रमाणे भारताने औद्योगिकरणाचा पाया किवा विकास घडवून आणण्यासाठी चांगले कार्य केले नाही. इंग्रजाच्या आगमनाने हस्तकला कौशल्य उद्योगांचा आधी सांगितल्याप्रमाणे अंतर्गत युद्धांमुळे समूळ नाश झाला. यामुळे मोठया प्रमाणावर बेरोजगारी आली आणि तिने लोकांना ग्रामीण भागांकडे वळण्यास आणि शेती हाच व्यवसाय स्वीकारण्यास भाग पाडले,साहजिकच, शेती व्यवसायावर स्वतःचाच खूप दबाव टाकला गेला. काही प्रमाणात येथे उत्पादन समूहांची स्थापना आणि तिकडे पारंपारिक हस्तकला कौशल्य उद्योगांना घाऊक विस्थापन देण्याशिवाय पर्यायच उरला नाही. पुढे नवीन उद्योगक्षेत्रांच्या वाढीचा दर आणि त्यांचा एकूण घरगुती उत्पादनांतील सहभाग खूप कमी प्रमाणात शिल्लक राहिला.

वस्तुस्थिती अशी आहे की वसाहतीची योजना दोन विशिष्ठ कारणासाठी भारतातील औद्योगीकरणाच्या विरोधात होती. पहिले, भारताचा दर्जा आगामी काळांत केवळ ब्रिटन मधील अस्तित्वात येणाऱ्या महत्वाच्या कच्च्या मालाचा निर्यातदार म्हणून खाली आणावयाचा आणि दुसरे, भारताला त्या उद्योग समुहांच्या उत्पादनाचा विखुलेला बाजार म्हणून बदलून टाकायचा.

**विदेश व्यापाराची स्थिती**

शेतकी आणि उद्योग क्षेत्रातील अस्तित्वात असलेली स्थिती देशाच्या विदेश व्यापारावर परिणामकारक ठरली. शेतीच्या बाजारीकरणाने भारताला प्राथमिक शेती उपदितांचे जसे कच्चे सिल्क, कापूस,लोकर,साखर,नील,जूट इ.निर्यातदार बनण्यासाठी भाग पाडले. इंग्लंड हे निर्यातीचे प्रमूख गंतव्य होते जिथे उद्योगसमूह हा कच्चा माल ग्राहक वस्तू उत्पादनासाठी आणि परत भारताकडे निर्यात करण्यासाठी करत असत. जेव्हा भारताकडे ग्राहक वस्तू उत्पादनाचे पुरेसे उद्योग नाहीत तेव्हा भारत या

वस्तूंचा जसे कापूस,सिल्क,लोकरीचे कपडे आणि भांडवली वस्तू जसे हलकी यंत्रणा यांचा ब्रिटनकडून आयातदार देश बनला. म्हणून सर्व प्रायोगिक उद्देशांसाठी, भारताच्या आयात आणि निर्यातीवर ब्रिटन एकाधिकार नियंत्रित करू लागले. असे लक्षात आले की भारताच्या विदेश व्यापाराच्या निम्म्याहून अधिक व्यापार हा ब्रिटन पर्यंतच मर्यादित होता. १८६९ मध्ये सुएझ कालवा अस्तित्वात आल्यानंतर भारताच्या परदेश व्यापारावर ब्रिटनचे तीव्र नियंत्रण होते. जरी भारताने निर्यातीतून फायदेशीर उत्पन्न कमविले तेथे सोन्याची किवा परकीय चलनाची आवक काहीच नसायची कारण मिळालेली अतिरिक्त कमाई ब्रिटनच्या व्यवस्थापनाने ब्रिटनमधील सरकारी वसाहतींनी निर्माण केलेल्या कचेर्यांमधील खर्चाची देयता भागविण्यासाठी उपयोगात आणला जात असे. जगात नवीन वसाहती बनविण्यासाठी इंग्रज सरकारने जगातील विविध भागात लढलेल्या युद्धावरील खर्च आणि अदृश्य पदार्थांच्या आयातीसाठी खर्च येथे तो पैसा वापरला जात होता. अशाप्रकारे ब्रिटीशांनी विदेश व्यापार मार्गांनी भारतातील संपत्तीचा विध्वंस केला.

इतर देश ज्यांच्याशी भारताचे व्यावसायिक नाते होते त्यामध्ये चीन, सिलोन (श्रीलंका) आणि पर्शिया (इराण) या देशांचा समावेश होता.

**सारांश**

१९२१ च्या जनगणनेनुसार तेव्हापासून भारताने अगोदरच अधिक लोकसंख्या वाढीच्या अनुरोधाने लोकसंख्या शास्त्रीय संक्रमणाच्या दुसऱ्या पायरीवर प्रवेश करण्यास सुरुवात केली आहे. जीवनाचा दर्जा जो शैक्षणिक कामगिरी - यशसंपदा आणि आरोग्याची काळजी यांनी सूचित केला गेला तो खूप कमी प्रतीचा होता. एकीकडे ८४ टक्के लोकसंख्या अशिक्षित होती,जीवनमानाची मर्यादा ३२ वर्षांपर्यंत खालच्या पातळीवर होती. अर्भकांच्या मृत्यूचा दर प्रत्येक हजारी २८१ इतका अधिकतम होता. आगगाडीच्या निर्मिती मुळे एक महत्वाची पायाभूत सुविधा इंग्रज व्यवस्थापनातून सरकारने भारताला प्रदान केली. तरीही त्यांचे मुख्य उद्दिष्ट हे कच्च्या मालाची आणि सैन्याची वाहतुक करून भारतातील लोकांपेक्षा इंग्रज वसाहतींचे हित साधणे, सेवा करणे हा होता. जवळपास भारतातील एकूण कामगारांच्या तीन चतुर्थांश लोक शेती व्यवसायावर अवलंबून होते,अशाप्रकारे आपल्या देशाला प्रार्थमिक उत्पादने बनविणारा आणि उद्योगात मागे राहिलेला देश बनविला. भारतीय शेती अधिक लोकसंख्येच्या दबावाखाली होती,बाजारीकरणामुळे आणि जमीनदारी पद्धतीच्या महत्तम पणामुळे त्रस्त होती. ब्रिटन भारताचा प्रमूख व्यावसायिक भागीदार म्हणून शेष राहिला आणि भारतीय संपत्तीचा निचरा करण्यासाठी परदेशी व्यवहारांतून भारताची पिळवणूक केली.